Title-Code:-MAHMAR52852

विशेषअंक
२७ ऑक्टोबर

दैनिक
# विदर्भ न्यायव्रती
निर्भिड निपक्ष एकमेव

संपादक: निलेश रमेश काळे
बुलढाणा , अकोला ,वाशीम
उपसंपादक : सुनिल मोरे   कार्यकारी संपादक: गजानन मारोडे

बुलढाणा • शुक्रवार २७ ऑक्टोबर 2023 • वर्ष-२ रा • अंक- 16 • भाषा - मराठी • अवधिकता : दैनिक • पृष्ठ :४ • मूल्य : ४   vidharbhayavrati@gmail.com

## विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालयात सायबर जनजागृती कार्यशाळा संपन्न




**कारंजा ( मोहम्मद बेग )**
**दैनिक विदर्भ न्यायव्रती**

---

स्थानीक विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालय कारंजा लाड येथे सायबर गुन्हे कमी करण्याच्या दृष्टीने जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी महाविद्यालयाचे पर्यवेक्षक श्री खरड सर,NSS प्रमुख आधम सर, लोढा सर, इंगोले सर तसेच ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यामध्ये सायबर क्राईम आणि त्याचे प्रकार, सोशल मिडीयाच्या माध्यमातून ऑनलाईन गुन्हे कसे घडतात व वाढत आहेत, इंटरनेट आणि मोबाईलच्या माध्यमातून होणारे फ्रॉड्स, फसव्या वेबसाइट्स आणि त्याद्वारे कशी फसवणुक होते आणि फसवणुक होवु नये म्हणुन कोणती काळजी घ्यावी याविषयी सार्थक ठाकरे व अभय सुरडकर या सायबर वॉरियर्स नी महत्वपूर्ण माहिती दिली.यामध्ये विदयार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली आणि त्यांना आलेल्या शंकांचे निरसन केले.

यावेळी मोबाइलच्या योग्य वापर करण्या विषयी शपथ घेण्यात आली.ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने व क्विकहिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ.जे. एम. साबू सर आणि उपक्रमाचे समन्वयक डॉ. एच.जे. खरात सर यांच्या मार्ग दर्शना खाली आयोजित करण्यात आली.यावेळी महाविद्यालयाचे पर्यवेक्षक खरड सर यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. शिक्षकवृंद पैकी लोढा सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आभार प्रदर्शन केले.

16 October